# आष्टी तालुक्यात मुसळधार पावसाने हाहाकार





पाटोदा संचार PATODA SANCHAR

E-mail-pat.sanchar@gmail.com संस्थापक संपादक- स्व.विश्वकर्मा डोळसे संपादक-विलास डोळसे

❑ पाटोदा/बीड ❑ स्थापना वर्ष ३५ वे, वर्ष २० वे ❑ अंक १९६ वा ❑ मंगळवार दि. १६ सप्टेंबर २०२५ ❑ पाने-४ किंमत १ रुपया ❑ पो.र.नं.एल/एसबी/बीड/रनंप-२२१/२०२५-२७ ❑ R.N.I. No.MAHMAR/46359

❑ PATODA/BEED ❑ YEAR 20 th ❑ Issu -196 ❑ Tuesday 16 September 2025 ❑ Page- 4 Price- Rs.1.❑ Post.Reg.No.L/SB/Beed/RNP-221/ 2025-27 ❑ R.N.I. No.MAHMAR/46359



# नागरिकांच्या बचावासाठी भारतीय सैन्याकडे मागीतली मदत

आष्टी । प्रतिनिधी

दोन दिवसांपासून झालेल्या उतरा नक्षत्रामधील मुसळधार पावसाने तालुक्यातील दौलावडगांव, धानोरा,धामणगाव, पिंपळा,कडा,या पट्ट्यात सोमवारी पहाटे अक्षरशः पाच-सहाच्या सुमारास अचानक ढगफुटीसदृष्य पाऊस झाला. खरीप हंगामातील सोयाबीन सह उडीद,मूग,तूर,ऊस पीकांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाल्याने या परिसरातील शेतकरीवर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचे प्रत्यक्ष दर्शनी पहाणी करणाऱ्या शेतक-यांनी सांगितले आहे.

दरम्यान रात्रभर तालुक्यात मुसळधार पाऊस झाल्यामुळे तालुक्यातील कडी, कांबळी, देविनिमगांव, नद्यांच्या पाणी पातळीत वाढ झाल्याने सकाळी तालुक्यातील बऱ्याच गावचा जनसंपर्क तसेच दळणवळण व्यवस्था खोळंबलेली दिसून येत होती.

**देविनिमगांवचा पुल गेला वाहून**

कडा-धामणगाव रस्त्यावरील देविनिमगाव येथे नव्याने बनविण्यात आलेला पुल या अतिवृष्टीच्या पावसाने वाहून गेल्याने हा मार्ग बंद पडला आहे.

दरम्यान अतिवृष्टी झाल्याने तालुक्यातील दौलावडगाव, धामणगाव,कडा परिसरात मोठ्या प्रमाणावर पिकांचे,घराचे नुकसान झाले आहे.या नुकसानीची पाहणी करण्यासाठी सकाळी ८ वा.जयदत्त धस व तहसिलदार वैशाली पाटील, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे यांच्या आदिंनी पाहणी करत नागरीक शेतक-यांच्या व्यथा जाणून घेत या सर्व परिस्थितीचा आढावा आमदार सुरेश धस यांना दिला.

इतिहासात पहिल्यांदाच कडी नदीला एवढ्या मोठ्या प्रमाणावर पुर आला आहे. याचे कारण आष्टी

पान दोन वर

## अतिवृष्टी, पूरबाधित गावांतील नागरिकांना आवश्यक मदत करण्याच्या पालकमंत्री अजित पवार यांच्या सूचना

उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार, यांनी अतिवृष्टी, पूरबाधित गावांतील नागरिकांना आवश्यक ते मदतकार्य तात्काळ करणेबाबत मा. जिल्हाधिकारी यांना सूचित केले आहे. त्यानुसार तात्काळ कार्यवाही स्थानिक पथक व शोध व बचाव पथकांच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

जिल्हा नियंत्रण कक्ष, मंत्रालय नियंत्रण कक्ष, एनडीआरएफ, आर्मी, विभागीय नियंत्रण कक्ष यांचे सोबत समन्वय स्थापन करण्यात येत असून स्थानिक तहसीलदार, उपविभागीय अधिकारी यांचे सोबत जिल्हाधिकारी स्वतः संपर्क ठेवून आहेत व पूर परिस्थितीवर नियंत्रण ठेवून आहेत. पूरग्रस्त गावातील नागरिकांनी घाबरू नये आणि प्रशासनास सहकार्य करावे. मा. जिल्हाधिकारी यांचेमार्फत सर्वांशी समन्वय साधून आवश्यक ठिकाणी मदत पाठवण्यासंदर्भात व बचाव कार्य करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

## आ.सुरेश धस यांनी घेतली सर्व विभागाचे प्रशासकीय अधिकाऱ्यांची तात्काळ बैठक

आपत्कालीन परिस्थितीमध्ये प्रशासनासोबत आपत्ती व्यवस्थापन बैठक घेऊन तात्काळ झालेल्या नुकसानीचे पंचनामे तसेच छोट्या मोठ्या व्यावसायिकांचे झालेले नुकसान याबाबत सूचना करत सगळे यंत्रांना बोललेले प्रत्येक मंडळी आहे पंचनामे तात्काळ करण्याच्या सूचना दिल्या.

यावेळी उपविभागीय अधिकारी वसीमा शेख,तहसीलदार वैशाली पाटील यांच्यासह सर्व विभागाचे प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते

## तब्बल १० तासांनी पुरात अडकलेल्यांना काढले बाहेर

आष्टी तालुक्यातील दौलावडगांव परिसरात सोमवारी पहाटे ढगफुटी झाल्याने कडा शहरात नदीचे पाणि शिरले,यामध्ये कडा शहरातील एकाच कुटुंबातील गोविंद सापते,योगेश सापते,असराबाई सापते,मीनाबाई सापते,सुषमा सापते,आर्या सापते,काजल सापते,कृष्णा ससे,अमोल बेदरे,आकाश बेदरे,सुमन बेदरे तर शेरी खुर्द येथील महेश ढोबळे,विजय ढोबळे,प्रिती महेश ढोबळे, सुर्वणा विजय ढोबळे, राजदीप विजय ढोबळे, गायबाई रामदास ढोबळे आणि मौजे टाकळी अमिया येथील शिवाजी दगडू महानवर,शकुंतला शिवाजी महानवर,साईनाथ नवनाथ महानवर, पारूबाई दगडू महानवर,शुभांगी नवनाथ महानवर यांना तब्बल दहा तासांनी राष्ट्रीय आपत्ती निवारण पथकाने हॅलीकॅप्टरने सुरक्षित बाहेर काढले.

## पुरात वाहून गेलेल्या तरुणाचा मृतदेह धामणगाव येथे नदीकिनारी सापडला

आष्टी । प्रतिनिधी



आष्टी तालुक्यातील धामणगाव परिसरात दि. १५ दुपारी दोन वाजताच्या सुमारास मुसळधार पावसामुळे आलेल्या पुरात एक ३० वर्षीय तरुण वाहून गेला. या घटनेची माहिती अंभोरा पोलिसांना मिळताच अधिकारी व कर्मचारी तत्काळ घटनास्थळी दाखल झाले.

गावकऱ्यांच्या मदतीने नदी परिसरात शोधमोहीम सुरू करण्यात आली. दलदल, चिखल व धोकादायक परिस्थिती असूनही पोलिसांनी अथक प्रयत्न सुरू ठेवले. सुमारे दोन तासांच्या शोधानंतर धामणगाव परिसरात नदी काठावर संबंधित तरुणाचा मृतदेह आढळून आला.

अंभोरा पोलिसांच्या तत्परतेमुळे अल्पावधीतच शोध मोहीम यशस्वीरीत्या पार पडली. मृतदेहाचा पंचनामा करून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या कारवाईत अंभोरा पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी मंगेश साळवे, पो.ह. लुईस पवार, पो.शि. शिवदास केदार व पो.शि. सतीश पैठणे यांनी सहभाग घेतला.

## नागरिकांच्या बचावासाठी भारतीय सैन्याकडे मागीतली मदत

आष्टी तालुक्यातील कडा, सुलेमान देवळा, पिंपरखेड, धानोरा, शिरापुर, टाकळी अमिया आणि डोंगरगण या गावांचा संपर्क तुटला आहे. तसेच कडा गावातील ११ नागरिक तर सुलेमान देवळा ०६, पिंपरखेड ०३, धानोरा ०३, डोंगरगण ०३, शिरापुर १० व टाकळी अमिया १५ असे एकूण सात गावात ५१ लोक अडकलेले होते. यासाठी एनडीआरएफ पथकाला पाचारण केले. तसेच एयरलिफ्टिंग ची व्यवस्था जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणकडुन मा. जिल्हाधिकारी यांचे प्रयत्नांनी करण्यात आलेली आहे. एअर फोर्सच्या माध्यमातून पूर बाधित गावांतील नागरिकांना सुरक्षित बाहेर काढण्याची कार्यवाही सुरू आहे. जिल्हाधिकारी यांनी सैन्यदल व राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल यांचे माध्यमातून बचाव कार्य सुरू केलेले आहे.

# नैसर्गीक आपत्ती आली...आ.सुरेश धसच..डिझास्टर मॅनेजर

## हेलिकॉप्टरद्वारे केली पाण्यामध्ये, घरामध्ये व शेतामध्ये अडकलेल्या नागरिकांची सुटका

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील कडा पिंपरखेड निमगाव चोभा या भागामध्ये मागील २४ तासांमध्ये झालेल्या अतिवृष्टी व ढगफुटीमुळे कांबळी / कडी नदीला आलेला महापूर व पाण्याची प्रचंड वाढलेली पाणी पातळी यामुळे घाटा पिंपरी, दादेगाव, डोंगरगण, सुलेमान देवळा, कडा, शेरी खुर्द, या गावांमध्ये दोन नदीपात्रांच्या मध्ये व नदीपात्रालगत लोक वस्त्यांमध्ये लोक अडकलेले आहेत याची माहिती मिळताच नेहमीप्रमाणेच नैसर्गिक आपत्तीला तोंड देत संकटावर मात करण्याची जिद्द आणि जनतेविषयी तळमळ असणारे आमदार सुरेश धस हेच आष्टी तालुक्यातील जनतेसाठी डिझास्टर मॅनेजर ठरलेले आहेत.

आमदार सुरेश धस यांनी तात्काळ जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आणि जिल्हा प्रशासनाशी संपर्क करून एनडीआरएफ यंत्रणेला ला पाचारण करून हेलिकॉप्टरची व्यवस्था करून या नैसर्गिक आपत्तीमध्ये अडकून पडलेल्या नागरिकांना जीवदान देऊन मोठा दिलासा दिला आहे. जयदत्त यांनी पहाटेच तहसीलदार वैशाली पाटील आणि तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे यांचेशी संपर्क करून डोंगरगण भागामध्ये शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन या ढगफुटीची पाहणी केली होती त्याचवेळी आमदार सुरेश धस सकाळी सात वाजल्यापासून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पालकमंत्री अजित पवार बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन अहिल्यानगर जिल्हाधिकारी पंकज आशिया भारतीय लष्कर राष्ट्रीय आपत्ती निवारण दल एनडीआरएफ नाशिक यांच्या संपर्कात राहिल्यामुळे अखेर हेलिकॉप्टर द्वारे कडा, टाकळी अमिया, शेरी बु. येथील नदीच्या पाण्यामध्ये घरामध्ये व शेतामध्ये अडकलेल्या नागरिकांना सुखरूप योग्य स्थळी पोहचवले आहे.



महाराष्ट्रात ढीगभर लोकप्रतिनिधी आहेत परंतु सतत जनतेच्या संपर्कात राहून वेळोवेळी आलेल्या संकटांमध्ये अत्यंत कर्तव्यदक्षतेने आणि तळमळीने काम करणारे मोजके नेते महाराष्ट्रामध्ये आहेत त्यामध्ये आ. सुरेश धस यांचा अग्रक्रम आहे त्यामध्ये बीड जिल्ह्यात तर सुरेश धस यांचे शिवाय सोडून कुणीही सापडणार नाही ही वस्तुस्थिती आहे.

पावसाची तीव्रता कमी झाल्यानंतर शासकीय पातळीवर योग्य पंचनामे होऊन विहित कालावधीत मदत मिळवण्यासाठी आ. सुरेश धस हे शासन दरबारी नेहमीप्रमाणे पाठपुरावा करणार आहेतच आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरघोस अर्थसहाय्य मिळवून देणारच आहेत याविषयी आष्टी मतदार संघातील जनतेमध्ये विश्वास पसरलेला आहे. नेहमीच संकटामध्ये धावून जाऊन जनतेला दिलासा देण्याचे काम कसे करावे? याचा धडा महाराष्ट्राला घालून देण्याचे काम आमदार सुरेश धस यांनी नेहमीच केले आहे. तसेच त्यांनी आज आष्टी तालुक्यामधील जनतेला लोकप्रतिनिधींचे काम काय असते हे करून दाखवून दिले आहे.

जयदत्त धस सकाळी सात वाजल्यापासून कडा डोंगरगण दौलवडगाव, धामणगाव जिल्हा परिषद गटात घाटा, पिंप्री, केळ,हरेवाडी, देऊळगाव घाट, शेडाळा, वेलतुरी, गंगादेवी, सावरगाव मायंबा,डोंगरगण या गावांना भेटी देऊन झालेल्या अतिवृष्टीची व झालेल्या नुकसानीची पाहणी करत आहेत, सागर धस हे देखील कडा व परिसरामध्ये झालेल्या अतिवृष्टी व पाण्यामध्ये अडकलेल्या नागरिकांना मदत करण्यासाठी सहकार्य करत आहेत.

मौजे टाकळी अमिया येथील. १)शिवाजी दगडू महानवर , २) शकुंतला शिवाजी महानवर, ३) साईनाथ नवनाथ महानवर, ४)पारूबाई दगडू

पान दोन वर

# ‘अहिल्यानगर-बीड-परळी वैजनाथ’ रेल्वेमार्ग प्रकल्पासाठी १५० कोटी निधी वितरीत

## पालकमंत्री अजित पवार यांच्याकडून बीड जिल्हा वासियांना मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाची भेट

मुंबई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या विकासात गेम चेंजर ठरणाऱ्या ‘अहिल्यानगर-बीड-परळी वैजनाथ’ या महत्त्वाकांक्षी नवीन ब्रॉड गेज रेल्वेमार्ग प्रकल्पाला गती देण्यासाठी राज्य शासनाने आजवर तब्बल २ हजार ९१ कोटी रुपये उपलब्ध करून दिले आहेत. त्यात आज नव्याने १५० कोटींची भर घालून तो निधी आज वितरीत करण्यात आला आहे. या निधीच्या वितरणामुळे या रेल्वे प्रकल्पाच्या कामाला अधिक गती मिळणार असून, बीडकरांना उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाची अनोखी भेट दिली आहे. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या मुहूर्तावर, म्हणजेच दि. १७ सप्टेंबर रोजी ‘बीड-अहिल्यानगर’ या टप्प्यावरील रेल्वेसेवेचा शुभारंभ करण्यात येणार आहे. या ऐतिहासिक घटनेमुळे बीड जिल्ह्यातील लाखो नागरिकांचे स्वप्न प्रत्यक्षात उतरणार आहे.





‘अहिल्यानगर-बीड-परळी वैजनाथ’ या प्रकल्पासाठी राज्य शासनाचा एकूण आर्थिक सहभाग ५० टक्के असून, आजवर शासनाने तब्बल २ हजार ९१ कोटी रुपये उपलब्ध करून दिले आहेत. त्यात आता नव्याने १५० कोटींची भर घालण्यात आली आहे. या निधीचा उपयोग २०२५-२६ या आर्थिक वर्षात रेल्वे विभागाला राज्य सरकारचा हिस्सा देण्यासाठी केला जाणार आहे. ‘अहिल्यानगर-बीड-परळी वैजनाथ’ हा रेल्वेमार्ग सुमारे २६१ किलोमीटर लांबीचा असून, त्याचा एकूण खर्च ४ हजार ८०५ कोटी रुपये इतका आहे. त्यातील ५० टक्के म्हणजे २ हजार ४०२ कोटी रुपये राज्य शासनाचा वाटा आहे. आजपर्यंत शासनाने तब्बल २ हजार ९१ कोटी २३ लाख रुपये उपलब्ध करून दिले आहेत. त्यात आता आणखी १५० कोटींची भर घालण्यात आली असून या निधीचे वितरण आज (दि. १५ सप्टेंबर २०२५ रोजी) करण्यात आले आहे. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या दोन दिवस आधी वितरीत करण्यात आलेल्या या निधीमुळे या प्रकल्पाच्या विकासाला गती येणार आहे. या निधीचा उपयोग २०२५-२६ या आर्थिक वर्षात रेल्वे विभागाला

पान दोन वर

संचार

# पावसाचा; हाहाकार शेतकरी चिंतेत

बीड जिल्ह्यात पावसाने हाहाकार उडवून दिला. प्रचंड विध्वंस पाहण्यास मिळाला. १६ मध्यम, १२७ लघू प्रकल्प ओसंडून वाहू लागले. सर्वच नद्या, नाल्यांना महापूर आला. बंधारे फुटले, नदीचे पाणी शेतात घुसले, शेकडो गावांची वाहतूक ठप्प झाली. पावसाच्या रौद्ररूपाने शेतकर्यांच्या डोळ्यात अश्रू तरळले. तब्बल तीन लाख हेक्टरवरील खरीप हंगाम पाण्यात बुडाला. काढणीला आलेले सोयाबीन उद्धवस्त झाले. हातातोंडाशी आलेला कापसाचा घास नेस्तनाबूत झाला. आष्टी तालुक्यात कांद्याचा चिखल झाला. बाजर्यांचे कणसं पाण्यात वाहून गेले. यंदा शेतीतून नफा तर काहीच नाही. केलेली मेहनत वाया जाणार, यंदा शेती आतबट्ट्याची राहणार.शेती उद्धवस्त झाल्याने बीड जिल्ह्यातील शेतकरी चिंतेच्या गर्तेत अडकले आहे.

शेतकर्यांना वेशीस अडवण्याचे काम कधी सरकारने केले तर कधी निसर्गाने. पंधरा वर्षापासून शेतकर्याला नागवण्याचे काम चालू आहे. कधी नव्हे ते मे महिन्यात पाऊस झाला. मोठ्या उत्साहाने काळ्या आईची ओटी भरली आणि आश्वासक पावसाने धोका दिला. कोरडा दुष्काळ पडतो की काय असे वाटत असतानाच पावसाने दिलासा देण्याचे काम केले. पुढच्याच महिन्यात म्हणजे ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात अतिवृष्टी झाली. प्रचंड नुकसान झाले. पिकांची वाढ खुंटली. एक लाख हेक्टरवरील पीक पाण्यामध्ये होते.त्यातूनही कसेबसे सावरणारा शेतकरी दोन दिवसांत झालेल्या अतिवृष्टीने अक्षरश: उद्धवस्त झाला आहे. हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला. काढणीला आलेले सोयाबीन, पाण्याखाली हरवले. शेतामध्ये गुडघ्याएवढे पाणी घुसले. कापूस, बाजरी आडवी झाली. कांद्याचा चिखल झाला. वर्षभर काबाड कष्ट करून सोनं पिकवलेल्या शेतकर्यांच्या घामाची माती झाली. बीड जिल्ह्यात तीन लाख हेक्टरवरील खरीप हंगाम पाण्यामध्ये नेस्तनाबूत झाला. ओढ्या नाल्याचे आणि नदीचे पाणी शेतीत घुसले. प्रचंड नुकसान झाले. आता काय खावे आणि वर्ष कसे काढावे या चिंतेमध्ये शेतकरी थरथरणार्या हाताने आणि लुकलुकणार्या डोळ्याने पाण्यात तरंगत असलेल्या पिकांकडे पाहतच राहिला. अर्धा खरीप सध्या पाण्यामध्ये बुडालेला आहे. पंचनामे होतील, तुटपुंजी मदतही मिळेल मात्र बरकत येणारे धान्य यंदा लक्ष्मीच्या रूपाने घरात येते की नाही याबाबत शेतकर्यांनाच आता विश्वास राहिला नाही.

गेल्या सोळा तासांपासून मुसळधार पावसाचा कहर कायम असून शेतकऱ्यांच्या डोळ्यातील मेहनतीचे स्वप्न अक्षरशः पाण्यात वाहून गेले आहे. रात्रीपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे शेतात पाणी साचून कांदा पिकाचे प्रचंड नुकसान झाले आहे. याचबरोबर बाजरी, मका, पालेभाज्या, फळबागा, नवीन ऊस लागवड या पिकांनाही मोठा फटका बसला आहे.

कांद्याची खर्चिक लागवड उद्धुस्त झाल्याने शेतकरी वर्गात हतबलता पसरली आहे. अनेक शेतात पाणी तुडुंब भरल्याने उभे पीक आडवे झाले आहे. नाले व ओढ्यांना पूर आल्याने पाणी बाहेर जाण्याचा मार्ग बंद झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी कष्टाने उभी केलेली पिके एका रात्रीत नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. या अनपेक्षित आपत्तीमुळे शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे तातडीने पंचनामा करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्याची मागणी केली आहे.

पावसाचा जोर कायम राहिल्यास नुकसानाची तीव्रता आणखी वाढण्याची भीती शेतकऱ्यांना सतावत आहे. शेती पाण्याखाली गेल्याचे विदारक चित्र पाहून शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रू आणि मनात असहाय्यतेची भावना दाटून आली आहे. प्रशासनाने त्वरित उपाययोजना करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी एकमुखी मागणी होत आहे.

# बीडच्या रेल्वे मार्गाचा इतिहास:स्व.केशरकाकूंच्या प्रयत्नाला सलाम!

अहमदनगर-बीड-परळी नवीन रेल्वे मार्ग हा सर्वोच्च प्राधान्याने राबविण्यात येत असलेल्या प्रकल्पांपैकी एक आहे. सर्वात महत्त्वाच्या पायाभूत सुविधा विकास प्रकल्पांपैकी एक असलेला हा प्रकल्प आहे. मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्र जोडणारा हा महत्त्वाचा रेल्वे मार्ग २६१.२५ किलोमीटर लांबीचा आहे. त्यापैकी अहमदनगर ते बीड हे काम जवळपास पूर्ण झाले असून विद्युत जोडणी बाकी आहे,लवकरच नगर ते बीडपर्यंत रेल्वेमार्गाचे काम पूर्ण होणार असून मराठवाड्यातील प्रवाशांचा प्रवास सोपा आणि सुखकर होणार आहे.या रेल्वे मार्गासाठी कोणत्या काळात कुणी कोणते काम केले हेही नवीन पिढीला माहीत होणे गरजेचे आहे,मुळातच तत्कालीन खा केशरकाकू क्षीरसागर यांनी केलेला प्रयत्नांना सलाम करावा असा इतिहास आहे,स्व काकूंचा पाठपुरावा आणि माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केलेली अर्धा खर्च राज्य सरकारने उचलण्याची महत्वाची मागणी तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्याकडे केली व त्यांनी मंजूर केली आणि आजतागायत सुरू राहिली म्हणूनच हा रेल्वे मार्ग आज पूर्ण होताना आपण बघत आहोत यासाठी अनेकांनी योगदान दिले आहे ते नाकारता येत नसले तरी खरी माहिती देखील दृष्टीआड करता लपवता येणार नाही,स्व गोपीनाथराव मुंडे,बीडचे नगराध्यक्ष डॉ भारतभूषण क्षीरसागर,जेष्ठ संपादक स्व नामदेवराव क्षीरसागर,स्वातंत्र्य सैनिक स्व बन्सीधरराव जाधव,स्व हिरालाल सारडा,स्व मदनलाल सारडा,जेष्ठ उद्योजक सत्यनारायण लाहोटी,गो गो मिसाळ,अतहर बाबर, जेष्ठ नेत्या उषा दराडे, सुशीला मोराळे,स्व अमोल गलधर,गिरीश देशपांडे,डॉ अरुण भस्मे,पत्रकार गुलाब भावसार,नटवर लाल बुद्धदेव,नामदेव चव्हाण आणि अशा अनेकांचा सहभाग या मागणीसाठी होता आणि आहे

अहमदनगर-बीड-परळी हा रेल्वेमार्ग जिल्ह्यासाठी महत्त्वाचा विकास प्रकल्प आहे.त्यावेळी खा केशरकाकू यांनी तत्कालीन तत्कालीन पंतप्रधान नरसिंह राव यांना भेटून १९९५ मध्ये तांत्रिक मान्यता देऊन हा रेल्वेमार्ग मंजूर करण्यात आला. या २६१ किलोमीटरच्या मार्गाला सुरूवातीला केवळ ३५३ कोटी रुपये खर्च अपेक्षित होता.पुढे यासाठी ४४५० कोटींचा निधी प्रस्तावित झाला,यासाठी केंद्राकडून इतका निधी एकाच वेळी मिळणे शक्य नव्हते या साठी



लागणाऱ्या निधीची तरतूद केंद्र व राज्य सरकार संयुक्तपणे करावा अशी आग्रही मागणी तत्कालीन मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी मंत्रिमंडळ बैठकीत केली आणि मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनीही हिरवा कंदील दिला आणि खऱ्या अर्थाने या मार्गाला गती मिळाली नेमकी हीच बाब आज मैलाचा दगड झाली,हा रेल्वे मार्ग व्हावा यासाठी स्व काकूंनी नेमके काय काय प्रयत्न केले हेही कळायला हवेत ते या ठिकाणी देत आहोत

बीड जिल्ह्यातील विकासाच्या संदर्भात स्व काकूंनी स्वतः प्रयत्न करत असताना रेल्वे मार्ग आणि दूरदर्शन या दोन प्रमुख मागण्यासाठी बीड जिल्ह्यातील स्वातंत्र्य सैनिक व लोकप्रतिनिधीचे शिष्टमंडळ घेऊन तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी,राष्ट्रपती ग्यानी झेलसिंग,शंकर दयाळ शर्मा यांची भेट घेऊन या दोन आग्रही मागण्या मांडून चर्चा केली होती सर्वात प्रथम रेल्वे संदर्भात १९८० साली तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी राष्ट्रपती ग्यानी झेलसिंग, डॉ शंकर दयाल शर्मा आणि तत्कालीन रेल्वेमंत्री गणी खान चौधरी ,जाफर शरीफ माधवराव शिंदे यांना भेटून स्व.काकूंनी बीड जिल्ह्याच्या या प्रश्नाकडे त्यांचे लक्ष वेधले होते,सुरुवातीला सौताडा मार्गे नगर असा सर्व्हे झाला त्यावेळी रेल्वे खात्याने आर्थिकदृष्ट्या हा रेल्वे परवडणारा नसल्याचे कळवले होते तेव्हा स्व काकूंनी बीड जिल्ह्याचा विकास करायचा असेल तर हा न परवडणारा मार्ग अंमळनेर मार्गे करणे आवश्यक असल्याचे म्हटले तेव्हा या संदर्भात स्व इंदिरा गांधी यांनी सकारात्मक भूमिका व्यक्त करून सर्वेक्षण करण्याच्या सूचना दिल्या होत्या परंतु १९८४ साली ऑक्टोबर महिन्यात इंदिरा गांधी यांची हत्या झाली, राजीव गांधी पंतप्रधान झाले त्यानंतर १९८५ ला देशात निवडणुका लागल्या आणि स्वर्गीय राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन झाले तेव्हा स्वर्गीय काकूंनी राजीव गांधी यांच्याकडे सातत्याने रेल्वे संदर्भात पाठपुरावा केल्यानंतर नगर बीड परळी रेल्वे मार्गाचे सर्वेक्षण सुरू झाले १९८९-९० साली देशात सार्वत्रिक निवडणूक झाली या निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाला होता,तेव्हा या मागणीला खंड पडला,स्वर्गीय काकूंचा पराभव झालेला असतानाही त्यांनी या मागणीचा पाठपुरावा सोडला नाही,१९९१ साली पुन्हा देशात लोकसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या काँग्रेस पक्ष स्वर्गीय राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढत होता प्रचारादरम्यान राजीव गांधी यांची हत्या झाली तेव्हा केशर काकू बीडमधून निवडून आल्या होत्या त्यावेळी देशाचे पंतप्रधान म्हणून स्व नरसिंहराव हे पंतप्रधान झाले त्या काळात रेल्वेमंत्री म्हणून सुरेश कलमाडी हे होते या काळात केशर काकू क्षीरसागर यांनी प्रयत्नांची शिकस्त करून नरसिंहराव यांच्याकडे आग्रही भूमिका मांडली आणि मंजुरीही करून घेतली तेव्हाच तत्कालीन अर्थमंत्री प्रणव मुखर्जी यांनी रेल्वे बजेट मध्ये बीडसाठी निधीची घोषणा करून ती मंजूर केली आणि पुढच्या कामाला सुरुवात देखील झाली

पंधरा वर्षापासून मी खासदार आहे १९८० च्या पहिल्या निवडणुकीपासून मी बीड जिल्ह्यातील जनतेला रेल्वेचे आश्वासन दिले आहे मला स्वर्गीय इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांनी आश्वासन दिले होते परंतु ते दुर्दैवाने आता नाहीत तेव्हा माझा हा प्रश्न निकाली काढावा अशी कळकळीची विनंती स्वर्गीय केशर काकू यांनी नरसिंहराव यांच्याकडे केली केली होती त्याचवेळी नरसिंहराव यांनी या रेल्वे मार्गाला हिरवा कंदील दाखवत मंजुरी देऊन टाकली प्रणव मुखर्जी त्यानंतर चंपावती क्रीडा मंडळाच्या मैदानावर या रेल्वे मार्गाचे भूमिपूजन तत्कालीन रेल्वेमंत्री सुरेश कलमाडी यांच्या हस्ते भूमिपूजन झाले १९९९ ते २००४ यादरम्यान पुन्हा माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर हे विधानसभा निवडणुकीत चौसाळा मतदार संघातून विजयी झाले आणि राज्याच्या मंत्रिमंडळात मंत्री म्हणून त्यांचा समावेश झाला त्यावेळेस राज्याचे मुख्यमंत्री म्हणून स्वर्गीय विलासराव देशमुख हे होते नगर बीड परळी रेल्वे मार्गाला केंद्राकडून पाहिजे तसा निधी मिळत नसल्यामुळे माजी मंत्री क्षीरसागर यांनी मंत्रिमंडळ बैठकीत याविषयी आग्रही मागणी करून राज्य सरकारचा ५० टक्के वाटा दिल्यास हा रेल्वे मार्ग होऊ शकतो असा प्रस्ताव मांडला विलासराव देशमुख यांच्या पुढाकाराने ती मागणी मंजूर झाली आणि ती आजतागायत पुढेही चालू आहे,यामुळेच राज्य सरकारचा पन्नास टक्के वाटा या मार्गाला मिळत राहिला आणि या मार्गाचे काम पुढे होत गेले,या रेल्वे मार्गाच्या निधीसाठी वारंवार पाठपुरावा करत प्रत्येक सरकारच्या काळात रेल्वे मंत्र्यांना भेटून वाढीव निधीसाठी प्रयत्न करत राहिल्या,तत्कालीन मंत्री सुरेश कलमाडी, लालू प्रसाद यादव,जाफर शरीफ,सुरेश प्रभू ही नेते मंडळी स्व काकूंची भेट होताच बीडच्या रेल्वेबाबत चर्चा करत असत म्हणजे जोपर्यंत काकू खासदार होत्या तोपर्यंत बीड रेल्वे साठीची त्यांची तळमळ लक्षात घेत होते

एकंदरीतच स्व काकूंनी अहमदनगर बीड परळी रेल्वे मार्गासाठीचा संघर्ष तब्बल २० वर्ष केला होता,या काळात हा मार्ग मंजूर होणे,सर्वेक्षण होणे,भूसंपादन होणे,रेलबजेटमध्ये निधी मिळवणे,माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांची आग्रही मागणी मंजूर होणे राज्य सरकारचा ५० टक्के वाटा मिळणे आणि पुढे हे काम जलदगतीने सुरू होणे आणि आता नगर बीड हा रेल्वे प्रवास सुरु होणे असा आहे.

**-प्रशांत सुलाखे,**
बीड

## पान १ वरुन

### आष्टी तालुक्यात मुसळधार

तालुक्याच्या सरहद्दीवर वर पाथर्डी तालुक्यातील माणिक दौंडी,बोरसेवाडी,आलनवाडी या भागात रविवारी मध्यरात्री ढगफुटी झाली.व आष्टी तालुक्यातही दौलावडगांव परिसरात अतिवृष्टी झाली.परिणामी कडी नदीला पहाटेपासून पाणि वाढत चालले सकाळी ८ च्या सुमारास तर कडा शहरात पाणि घुसले

यावर सकाळ पासुनच आमदार सुरेश धस,तहसिलदार वैशाली पाटील, ग्रामसेवक बाळासाहेब थोरवे,अनिल ढोबळे,युवराज पाटील, रमजान तांबोळी,यांच्यासह सर्व अधिकार, पदाधिकारी उपस्थित होते.येथे आल्यानंतर आमदार धस यांना तालुक्यात विविध ठिकाणी पुरामध्ये ४४ जण अडकले आहेत असे तहसिलदार यांनी सांगितले,आणि दुपारी बारा नंतर या पुरात अडकलेल्या नागरिकांना वाचवण्यासाठी गतीने चक्रे फिरली आणि आमदार धसांनी वजन वापरून अहिल्यानगर येथील मिलेट्रीचे हॅलीकॅप्टर बोलवून ह्या पथकाने दोन वाजता आडकलेल्या लोकांना आणण्यासाठी गेले घटनास्थळी दोन वाजून विस मिनीटानी पोहचले दोन चाळीसला त्यांना सुखरूप बाहेर काढले यावेळी आमदार सुरेश धस, प्रांताधिकारी वसिमा शेख,तहसिलदार यांच्यासह नागरीक मोठ्या संखेने घटनास्थळी होते.

**सुखरूप पोहचलो**

पुरात आडकलेल्या एकाच कुटुबांतील ११ जणांना हॅलीकॅप्टरने सुखरूप बाहेर आणले त्यांना पहाण्यासाठी गावकरी आणि महामार्गावरील लोकांनी मोठी गर्दी केली होती,यावेळी पाण्यातून बाहेर आल्यावर गोविंद सापते,योगेश सापते, असराबाई सापते,मीनाबाई सापते यांना घेरा घातला, आमदार सुरेश धस यांनी या भांबावलेले कुटूंबाला आधार देत.पुढील उपचारासाठी कडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले.आण्णा तुमच्यामुळे आम्ही वाचलोत आता जिवातजीव आला म्हणत कुटुंबाने आमदार धस यांचे आभार मानत सुखरूप पोहचलो एकदाचे असे सापते म्हणत त्यांच्या चेहर्यावर आंनद दिसत होता.

### नैसर्गीक आपत्ती आली...आ.सुरेश धसच..

महानवर, ५) शुभांगी नवनाथ महानवर मौजे कडा येथील १)गोविंद सापते, २) योगेश सापते, ३) असराबाई सापते, ४) मीनाबाई सापते, ५) सुषमा सापते, ६) आर्या सापते, ७) काजल सापते, ८) कृष्णा ससे, ९) अमोल बेदर, १०) आकाश बेदरे, ११) सुमन बेदरे मौजे शेरी खुर्द येथील १) महेश ढोबळे पाटील, २) विजय ढोबळे, ३) प्रिती महेश ढोबळे, ४) सुर्वणा विजय ढोबळे, ५) राजदीप विजय ढोबळे, ६) गायबाई रामदास ढोबळे या सर्व नागरिकांना इंडियन आर्मी नाशिक यांच्या माध्यमातून रेस्क्यू करून रुग्णालयामध्ये तपासणी करता दाखल करण्यात आला आहे.

### ‘अहिल्यानगर–बीड–परळी वैजनाथ’

राज्य सरकारचा हिस्सा देण्यासाठी होणार आहे.

बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद स्वीकारल्यापासून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जिल्ह्याच्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी विशेष लक्ष केंद्रित केले आहे. विमानतळ, रेल्वे व रस्ते विकासाला चालना देण्यासाठी विभागीय, जिल्हास्तरीय तसेच मंत्रालयीन पातळीवर विविध बैठका घेऊन त्यांनी संबंधित विभागांमध्ये प्रभावी समन्वय साधला आहे. या प्रयत्नांचा सकारात्मक परिणाम म्हणून ‘अहिल्यानगर-बीड-परळी वैजनाथ’ या महत्त्वाकांक्षी नवीन ब्रॉड गेज रेल्वेमार्ग प्रकल्पाला गती मिळाली आहे. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या मुहूर्तावर ‘बीड-अहिल्यानगर’ या टप्प्यावरील रेल्वे धावणार असून त्याचा थेट फायदा बीड जिल्ह्यातील लाखो नागरिकांना होणार आहे. ङ्गङ्ग अहिल्यानगर-बीड-परळी वैजनाथ रेल्वेमार्ग म्हणजे बीड, अहिल्यानगर आणि परळी वैजनाथ भागातील शेतकरी, विद्यार्थी, उद्योजक, व्यापारी आणि सामान्य जनतेसाठी विकासाला नवी गती देणारा प्रकल्प आहे. या मार्गामुळे जिल्ह्यातील गुंतवणूक वाढेल, रोजगारनिर्मिती होईल आणि वाहतूक सुलभ होईल. बीड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी हा प्रकल्प गतीमान करण्याचा माझा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे. बीड जिल्ह्याचा चेहरा बदलणाऱ्या या प्रकल्पामुळे बीडकरांच्या आयुष्यात नवा विकासप्रवास सुरू होईल असा विश्वासही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला आहे.

## पान चार वरुन

### शासनाने अतिवृष्टी पावसाने झालेल्या

क्षीरसागर यांनी केली आहे.

**शेतकऱ्यांनी, नागरिकांनी स्वतःची आणि आपल्या पशुधनाची काळजी घ्यावी**

पूर परिस्थिती निर्माण झाल्याने प्रशासनाकडून नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. शेतकऱ्यांनी व नागरिकांना स्वतःच्या आणि आपल्या पशुधनाची सुरक्षिततेसाठी काळजी घेण्याचे तसेच आज दिवसभर अतिवृष्टीची शक्यता वर्तवली आहे त्यामुळे गरज असेल तरच घराबाहेर पडा तसेच आपल्या सुरक्षिततेसाठी प्रशासनाशी संपर्कात राहून आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

**अधिकाऱ्यांना खबरदारी घेण्याच्या सूचना करत तात्काळ पंचनामे करण्यासाठी पत्र दिले**

अतिवृष्टीमुळे मतदार संघातील सर्वच तलाव पुर्ण क्षमतेने भरलेले आहेत. अधिक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, जायकवाडी यांना खबरदारी घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना कार्यकारी अभियंता यांना रस्ते व पुलाचे तात्काळ पंचनामे करणेसाठी पत्र व्यवहार देखील केला आहे.

### लिंबागणेश ते बोरखेड मार्गावरील रस्ता

खचलेल्या रस्त्याची व पुरस्थितीची पाहणी करून तहसीलदार चंदकांत शेळके व गटविकास अधिकाऱ्यांना यासंदर्भात अहवाल सादर केला आहे.

**नळकांडी ऐवजी कमानी पुलाची आवश्यकता**

या मार्गावर ७ गावे व १२ वस्त्यांचे दळणवळण अवलंबून असून शालेय मुले, दवाखाना, बाजारहाट, शेतीमाल व दुधदुभत्याच्या वाहतुकीसाठी हा रस्ता महत्त्वाचा आहे. मात्र, नळकांडी पुल पावसाळ्यात वारंवार वाहून जात असल्याने येथे कायमस्वरूपी उपाय म्हणून कमानी पुल बांधावा, अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

### मुसळधार पावसाचा तडाखा, पुल,

सांगितले जात आहे.अंबाजोगाई -मांडवा पठाण मार्गावरील वान नदीला आलेल्या पूरामुळे पुलावरून पाणी वाहू लागले असून, अनेक गावांचा संपर्क तुटला आहे.वाहतूक ठप्प झाली असून प्रशासनाने नागरिकांना खबरदारीचे आवाहन केले आहे.

अंबाजोगाई तालुक्यातील काही ठिकाणी लहान मोठे पूल वाहून गेले असल्याने गावांचा संपर्क पूर्णपणे तुटला आहे. नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्याचे काम सुरू आहे. अनेक ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाल्याने अंधाराचे साम्राज्य निर्माण झाले आहे.मांजरा प्रकल्पाच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ होत असल्याने सहा दरवाज्यांतून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. प्रशासनाकडून नागरिकांना अनावश्यक बाहेर पडू नये तसेच नदीकाठी जाऊ नये, अशी सूचना करण्यात आली आहे. तालुक्यातील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा, पोलीस व महसूल विभाग सतत परिस्थितीवर लक्ष ठेवून असून मदत व बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे.ग्रामीण भागातील ग्रामस्थांमध्ये मात्र भीतीचे वातावरण आहे. अंबाजोगाई तालुक्यातील मुसळधार पावसामुळे निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेता प्रशासन सतर्क झाले असून, नागरिकांनीही खबरदारी घेणे गरजेचे ठरत आहे.

### मराठा समाजाबद्दल आक्षेपार्ह

करण्याची मागणी केली होती. या अनुषंगाने वरिष्ठांचे निर्देश घेऊन परळी पोलिसांनी या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याबाबत देवराव लुगडे यांनी दिलेल्या फिर्यादीत हाके हे भाषणामध्ये मराठा समाजाला उद्देशुन म्हणाले की, तुम्ही आता ओबीसी मध्ये आलात, आता पहिले ११ विवाह आपल्या आपल्यामध्ये ठरवूयात, तुम्ही आमच्यात आल्याने जात पात राहिली का? पाटील, ९६ कुळी, क्षत्रिय तुम्ही राहिलात का?

तसेच त्याच व्हिडिओ मध्ये नवनाथ वाघमारे (रा. जालना) यांनी मराठवाड्यातील मराठा समाज हा निजामाची औलाद असुन या निजामाच्या औलादीला आपल्या आरक्षणामध्ये घेऊ नका, असे वक्तव्य केले होते. ही विधाने जातीच्या आधारावर अपमान होईल, असे मराठा समाजा विषयी भाषण केले. मराठा समाजाचा अपमान केला, मानहानी केली असे नमूद करण्यात आले आहे. यावरून दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास परळी पोलीस करत आहेत.

### बीड जिल्ह्यातील सर्व शाळांना

वडवणीच्या उर्दू कुंडलिका माजलगाव मांजरा या धरणातून देखील गेटमधून हजारो की सेक्स पाणी नदीपात्रात सोडण्यात येत असल्यामुळे अनेक गावात पूरस्थिती निर्माण झाली आहे.

बीड सह महाराष्ट्रात पुढचे काही दिवस पावसाचे संततदार सुरूच राहण्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे या पार्श्वभूमीवर बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी मंगळवारी जिल्ह्यातील सर्व शाळा महाविद्यालय आश्रम शाळा अंगणवाडी यांना सुट्टी दिली आहे.

शाळांना सुट्टी दिली असली तरी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या पार्श्वभूमीवर शिक्षक आणि कर्मचारी यांनी शाळेत हजर राहावे असेही आदेश जिल्हाधिकारी यांनी दिले आहेत.

# शेतकरी अस्मानी संकटात असताना महाराष्ट्राचे सुलतान मात्र गप्प ; शेतक-यांना सरसकट हेक्टरी ५० हजारांची मदत द्या-हर्षवर्धन सपकाळ

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात परतीच्या पावसाने धुमाकुळ घातला असून शेतकरी प्रचंड हवालदिल झाला आहे. राज्यभरातील जवळपास सर्वच भागातीलं पिकं वाया गेली आहेत, हा खरीप हंगामच वाया गेला आहे, शेतकरी उद्ध्वस्त झाला आहे. त्याच्याकडे पाहण्यास महायुती सरकारला वेळ नाही. शेतकरी एवढ्या प्रचंड संकटात महाराष्ट्राचे सुलतान देवेंद्र फडणवीस किंवा त्यांच्या मंत्रीमंडळातील एकही मंत्री मदत देण्याबाबत तोंडातून चकार शब्द काढत नाही. सरकारने या संकटाचे गांभिर्य लक्षात घेऊन शेतकऱ्याला सरसकट हेक्टरी ५० हजार रुपये तातडीची मदत द्यावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

टिळक भवन येथे पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, शेतकऱ्यांना मदत करावी यासाठी काँग्रेस पक्ष मे महिन्यापासून सातत्याने मागणी करत आहे. शेतकऱ्यांचे सर्वकाही पावसाने हिरावून घेतले आहे. पिकं तर गेली आहेतच लाखो हेक्टर जमीनही खरवडून गेली आहे. अशा वेळी मायबाप सरकारने भरघोस मदत करण्याची अपेक्षा असते पण आधीचे कृषीमंत्री रमी खेळण्यात व्यस्त होते तर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री त्याकडे लक्ष देत नाहीत. पालकमंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जायला हवे पण त्यांनाही वेळ नाही. शेतकऱ्यांचे अश्रू पुसण्यास महायुती सरकार गेले नाही. आता रब्बीच्या हंगामाकडे शेतकरी डोळे लावून बसला आहे, या हंगामासाठी बियाणे व खते मोफत पुरवावी असेही सपकाळ म्हणाले.

**मुंबई महानगरपालिकेवर प्रशासक नाही 'दरोडेखोर'...**

पावसामुळे मुंबईतली रस्त्यांचे मोठे नुकसान झालेले आहे. जागोजागी मोठे खड्डे पडले आहेत पण महानगरपालिका कुठेही काम करताना दिसत नाहीत. मुंबई महापालिकेकडे ९० हजार कोटी रुपयांच्या बँक ठेवी होत्या त्यावर महायुती सरकारने दरोडा टाकला असून वरून १३०० कोटी रुपयांचे कर्ज काढले आहे. महायुती सरकारने महानगरपालिकेवर प्रशासक नाही तर



दरोडेखोर बसवला असून मुंबईकरांच्या पैशांची लुट सुरु आहे, याप्रकरणी श्वेतपत्रिका काढा अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांनी केली आहे.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणविसांनी जाहीर माफी मागावी..**

बंगळूरु येथील मेट्रो स्टेशनच्या नामविस्तारावरून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खोटे बोलून जनतेची दिशाभूल केली आहे. यातून उच्चविद्याविभूषित देवेंद्र फडणविस यांच्या अज्ञानाचे दर्शन झाले. वास्तविक पाहता शिवाजी नगर हे एका परिसराचे नाव असून त्या भागात दोन मेट्रो स्टेशन आहेत. नाव बदलण्याचा कोणताही प्रस्ताव नाही पण शिवाजी महाराजांच्या नावाने फडणवीस यांनी माहिती न घेता आपल्या सवयीप्रमाणे खोटे बोलून दिशाभूल केली, त्याबद्दल त्यांनी जनतेची जाहीर माफी मागावी. खरे पाहता भाजपा परिवारानेच सातत्याने छत्रपती शिवाजी महाराज यांचा अपमान केलेला आहे. सावरकर यांनी महाराजांबद्दल काय लिहिले आहे हेही फडणविसांनी वाचावे. विशेष म्हणजे ज्या शिवाजी नगरवरून हा वाद घातला जात आहे तेथे मुस्लीम व अनुसूचित जाती बहुल जनता आहे, त्यांनी कधीही या नावाला विरोध केला नाही किंवा नाव बदला असे म्हटलेले नाही. पण फडणवीस जाणिवपूर्वक खोटे बोलून धार्मिक तणाव निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत असेही सपकाळ म्हणाले.

**अशोक चव्हाणांसारखा 'वनवास' सर्वांना मिळो....**

माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या विधानावर विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, अशोक चव्हाण यांना आमदार, खासदार, मंत्री, दोन वेळा मुख्यमंत्री, प्रदेशाध्यक्ष अशी विविध महत्वाचे पदे काँग्रेस पक्षाने दिली, त्यांचे वडील शंकरराव चव्हाण यांनाही मंत्री, दोन वेळा मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री अशी महत्वाचे पदे मिळाली, असा 'वनवास' सर्वांना मिळावा अशी भावना पक्ष कार्यकर्त्यांची आहे, असा टोला सपकाळ यांनी लगावला.

**मंगळवार दि. १६ सप्टेंबर रोजी टिळक भवन येथे रोजगार मेळावा**


राज्यात २.५ लाख सरकारी जागा रिक्त जागा असतानाही सरकार मात्र नोकर भरती करत नसल्याने लाखो पात्र मुले-मुली रोजगारापासून वंचित आहेत. तरुणांच्या हाताला काम मिळावे या भूमिकेतून काँग्रेस पक्षाने पुढाकार घेतला असून १६ सप्टेंबर रोजी टिळक भवन येथे भव्य रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. आयटी, बँकिंग, रिटेल, हेल्थकेअर, मॅन्युफॅक्चरिंग, सर्व्हिसेस अशा विविध क्षेत्रांतील ४० पेक्षा जास्त नामांकित कंपन्या सहभागी होणार आहेत.

# मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर मदत आणि बचावकार्यासाठी जिल्हा प्रशासनाने सतर्क रहावे-उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## आष्टी तालुक्यात पुरामुळे अडकलेल्या ४० जणांना एअरलिफ्ट करण्याचे दिले निर्देश

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबईसह राज्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंत्रालयातील राज्य आपत्कालीन कार्य केंद्राला भेट देऊन पावसामुळे उद्भवलेल्या परिस्थितीचा आढावा घेतला. बीड जिल्ह्यातील आष्टी पाथर्डी तालुक्यातील काही गावांना पुराच्या पाण्याने वेढल्याने अडकलेल्या ४० ग्रामस्थांना एनडीआरएफच्या मदतीने एअरलिफ्ट करून सुरक्षित ठिकाणी हलवावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. अतिवृष्टी असलेल्या जिल्ह्यातील जिल्हाधिकाऱ्यांशी यावेळी त्यांनी संवाद साधत मदत आणि बचाव कार्याबाबत माहिती घेतली आणि



जिल्हा प्रशासनाला सतर्कतेच्या सूचना दिल्या.

यावेळी उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव नविन सोना, कार्य केंद्राचे संचालक डॉ. भालचंद्र चव्हाण आदी उपस्थित होत. यावेळी डॉ. चव्हाण यांनी राज्यातील परिस्थितीची माहिती दिली. यावेळी त्यांनी पुणे, छत्रपती संभाजीनगर आणि मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरुन संवाद साधत त्यांच्याकडून पावसाची परिस्थिती जाणून घेतली. तसेच मुंबईत जिथे जिथे पाणी साचल्याच्या तक्रारी येत आहेत तिथे अतिरिक्त मनुष्यबळ तैनात करून लवकरात लवकर पाण्याचा निचरा होण्यासाठी पंप बसविण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

पुण्यात आणि राज्यात इतर ठिकाणी पडलेल्या पावसाचा आढावा घेतला. आष्टी पाथर्डी तालुक्यातील काही गावांना पुराच्या पाण्याने वेढल्याने त्यात ४० गावकरी अडकून पडले होते. त्यांना एनडीआरएफच्या मदतीने एअरलिफ्ट करून बाहेर काढावे लागेल, असे संभाजीनगरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. त्यानुसार नाशिक वरून हेलिकॉप्टर बोलवून या अडकलेल्या लोकांना तत्काळ एअरलिफ्ट करून सुरक्षित ठिकाणी हलवावे असे निर्देश उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिले. तसेच छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्तांशी देखील त्यांनी या कक्षातून संवाद साधला.


भारतीय हवामान विभागाने पुढील पाच दिवसांसाठी दिलेल्या हवामान अंदाजानुसार पावसाची परिस्थिती कशी राहणार आहे त्यानुसार आपत्ती नियंत्रणासाठी जिल्हा प्रशासनाने दक्षता घेण्याचे उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी सांगितले.

गेल्या २४ तासात सचेत पच्या माध्यमातून राज्यभरात पावसाचा अलर्ट देणारे ३५ कोटी मेसेज पाठविण्यात आल्याची माहिती डॉ. चव्हाण यांनी यावेळी दिली.

# आचार्य देवव्रत यांनी महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून घेतली शपथ

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे नवनियुक्त राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज मुंबईतील राजभवनात एका विशेष समारंभात आपल्या पदाची शपथ घेतली. विशेष म्हणजे, त्यांनी संस्कृत भाषेतून शपथ घेतली. या शपथविधी सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



सीपी राधाकृष्णन यांची उपराष्ट्रपतीपदी निवड झाल्यानंतर महाराष्ट्राचे राज्यपाल पद रिक्त होते, आणि आता ही जबाबदारी आचार्य देवव्रत यांच्याकडे सोपवण्यात आली.

आचार्य देवव्रत यांचा जन्म १८ जानेवारी पंजाबमध्ये १९५९ रोजी झाला. त्यांनी कुरुक्षेत्रातील गुरुकुलमध्ये शिक्षण घेतले. त्यांनी वेदांचे आणि भारतीय तत्त्वज्ञानाचे सखोल ज्ञान संपादन केले. ते एक उत्तम शिक्षणतज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते आहेत. त्यांनी गुरुकुल कांगरी विद्यापीठाचे आचार्य म्हणून काम केले आहे. शिक्षण आणि समाजसुधारणेच्या क्षेत्रात त्यांचे मोठे योगदान आहे.

देवव्रत हे २०१५ ते २०१९ या काळात हिमाचल प्रदेशचे राज्यपाल होते. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी नैसर्गिक शेती आणि पर्यावरणाच्या संरक्षणासाठी अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम राबवले. २०१९ मध्ये त्यांची गुजरातचे राज्यपाल म्हणून नियुक्ती झाली. गुजरातमध्येही त्यांनी नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी विशेष प्रयत्न केले. सप्टेंबर २०२५ मध्ये, त्यांनी महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून शपथ घेतली. त्यांनी ही शपथ संस्कृत भाषेतून घेऊन सर्वांचे लक्ष वेधले. आचार्य देवव्रत हे त्यांच्या साधेपणासाठी आणि सामाजिक कार्यासाठी ओळखले जातात.

# 'देवा' जरा इकडे बघ!

## मराठवाड्यातील अतिवृष्टीवरून अंबादास दानवे यांची मुख्यमंत्री फडणवीसांवर टीका

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

मराठवाड्यात जोरदार पाऊस झाला असून अनेक ठिकाणी पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांनी इथे लक्ष घालावे, शेतकऱ्यांच्या खात्यात एक दमडाही आला नाही अशी टीका शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते अंबादास दानवे यांनी केली आहे.

एक्सवर दोन व्हिडीओ पोस्ट करून अंबादास दानवे म्हणाले की, 'देवा' जरा इकडे बघ! 'देवा'ने हे दिले.. 'देवा' ने ते दिले.. असा गजर सध्या गल्लीगल्लीतुन भाजपायी भक्तगण अगदी सूर्योदयापासून करताना दिसतात. कचराकुंडी लगतच्या भिंती ते बहुमजली इमारती अश्या सगळ्या ठिकाणी या 'देवा'चे फोटो लागले आहेत. ज्या शिवरायांच्या पायावर यांचे देवाभाऊ फुले वाहताना दिसतात, त्यांनी कधी आपली प्रजा वाऱ्यावर सोडली नाही. नुसती फुले वाहून चालत नसतंय महोदय. विचार कृतीत उतरवावे लागतात असेही दानवे म्हणाले.

# हैदराबाद गॅझेटला आव्हान देणारी याचिका कोर्टाने स्वीकारली

**मुंबई । प्रतिनिधी**

मनोज जरांगे पाटील यांनी आझाद मैदान येथे मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी उपोषण करत सरकारला जेरीस आणले होते, त्यानंतर सरकारने मराठवाड्यातील मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी तसेच, हैदराबाद गॅझेट लागू करण्याची व पश्चिम महाराष्ट्रातील मराठा बांधवांसाठी सातारा गॅझेट लागू करण्याची मागणी मान्य केली, त्यानंतर हे गॅझेट लागू करण्याची प्रक्रिया सुरू झाली मात्र, अशातच आता हैदराबाद गॅझेटला आव्हान देणारी याचिका कोर्टाने स्वीकारली, मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी केलेली अधिसूचना बेकायदेशीर आहे ती रद्द करण्यात यावी अशी मागणी याचिकेत करण्यात आली आहे.

तसेच कुनबी प्रमाणपत्र कोणालाही दिले जाऊ नये, असा उल्लेखही याचिकेत केला गेला आहे.

मुंबईत आझाद मैदानात ५ दिवस उपोषणानंतर सरकारने मनोज जरांगेच्या मागण्या मान्य करत उपोषण सोडण्यासाठी विनंती केली होती, त्यानंतर मनोज जरांगे यांनी आम्ही विजयी झालो अस बोलत सरकारच्या निर्णयाचे स्वागत करत उपोषण मागे घेतले होते. मात्र, आता हैदराबाद गॅझेटला आव्हान देणारी याचिका कोर्टाने स्वीकारली, मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी केलेली अधिसूचना बेकायदेशीर आहे ती रद्द करण्यात यावी अशी मागणी याचिकेत करण्यात आली आहे. तसेच कुनबी प्रमाणपत्र कोणालाही दिले जाऊ नये, असा उल्लेखही याचिकेत केला गेला आहे. यासंदर्भात मराठा आरक्षण जीआरवर २५ सप्टेंबर रोजी सुनावणी होणार आहे. यावर आता मराठा समाज आणि आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची काय प्रतिक्रिया येते हे पाहणे महत्त्वाचे आहे.

मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्यासंदर्भात मनोज जरांगे पाटील यांनी वेळोवेळी सरकारकडे मागणी लावून धरली आहे. मुंबईतील आझाद मैदानावर नुकत्याच पुकारलेल्या बेमुदत उपोषणादरम्यानही मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याची मागणी केली होती. त्यानुसार प्रलंबित प्रकरणे जिल्हास्तरावरील समित्यांनी १५ दिवसांत पूर्ण करण्याचे आदेश गृह विभागाकडून देण्यात आले आहेत. महत्त्वाचे म्हणजे राज्य सरकारने आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याचा शासन निर्णय २०२२ साली काढला होता. तेव्हापासून आतापर्यंत ८५२ गुन्हे मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला असून यापैकी ४७१ प्रकरणे प्रलंबित आहेत. हे सर्व गुन्हे मागे घेण्याची प्रक्रिया न्यायालयीन स्तरावर आहे. त्यामुळे आता दोन दिवसात मराठा आंदोलकांवरील किती गुन्हे मागे घेण्यात येतात, हे पाहावे लागेल.

# पुढील २४ तास महाराष्ट्रासाठी धोक्याचे, आयएमडीचा धडकी भरवणारा इशारा

मुंबई । प्रतिनिधी

गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे मराठवाड्यात आणि विदर्भात काही ठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली आहे, अनेक गावांचा सर्पंक तुटला आहे.

पावसाचं संकट अजूनही टळलेलं नाहीये, १६ सप्टेंबरला देखील भारतीय हवामान विभागाकडून महाराष्ट्रात अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. पुढील २४ तासांमध्ये राज्यात पावसाचा जोर आणखी वाढणार आहे.

हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे, त्यामुळे कोकणातील जवळपास सर्वच जिल्ह्यांमध्ये पुढील चार दिवस कोसळधार पावसाची शक्यता आहे.

दरम्यान मंगळवारी म्हणजे १६ सप्टेंबर रोजी राज्यात पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता आहे, रायगड, पुणे, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, चंद्रपूर, गडचिरोली, सातारा आणि रत्नागिरी या जिल्ह्यांना पावसाचा हाय अलर्ट देण्यात आला आहे.

मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे, तर मुंबई, ठाणे आणि पालघरमध्ये पावसाचा जोर कमी होण्याचा अंदाज आहे.

# देवाभाऊ छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श घ्या; शरद पवारांचा मुख्यमंत्र्यांना टोला, नाशिकमध्ये सरकारविरोधात भव्य आक्रोश मोर्चा

नाशिक । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या (ड्हरीरव झुरी) वतीनं आज नाशिकमध्ये सरकार विरोधात भव्य आक्रोश मोर्चा काढण्यात आला. निवडणुकीपूर्वी सरकारने दिलेल्या कुठल्याच आश्वासनाची पूर्तता न केल्यानं काढण्यात आलेल्या या मोर्चात जिल्हाभरातून मोठ्या संख्येनं शेतकरी सहभागी झाले होते. या मोर्चाचं नेतृत्व शरद पवार यांनी केलं.

आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीनं नाशिकच्या अनंत कान्हेरे मैदानावरून सरकार विरोधात भव्य आक्रोश मोर्चा काढण्यात आला. शेतकरी कर्जमाफी, शेतकरी आत्महत्या, पिक विमा, पिकाला हमीभाव, युवकांना रोजगार, लाडक्या बहिणींना २१०० रुपये, कापूस आयात, असुरक्षित महिला, अतिवृष्टीमुळं झालेलं नुकसान, कांदा निर्यात बंदी, सरकारनं दुधाला १० रुपये अनुदान द्यावे हे प्रमुख प्रश्न घेऊन शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीनं आक्रोश मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, खासदार सुप्रिया सुळे, माजी मंत्री अनिल देशमुख, रोहिणी खडसे, आमदार रोहित पवार यांच्यासह पक्षाचे सर्व खासदार, आमदार, पदाधिकारी यांच्यासह मोठ्या संख्येनं शेतकरी सहभागी झाले होते.

अवकाळी पाऊस, शेतीला भाव नाही, कर्जबाजारीपणा यामुळं राज्यातील शेतकरी अडचणीत सापडला आहे. अशात मागील दोन महिन्यात २ हजार शेतकऱ्यांनी कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या करत आपलं जीवन



संपवलं. मी कृषीमंत्री असताना ७० हजार कोटी रुपयांची कर्जमाफी केली आणि शेतकऱ्यांना दिलासा दिला. मात्र, सरकार त्यांच्याकडं ढुंकूनसुद्धा पाहात नसून फक्त बघ्याची भूमिका घेत आहे. आता २ हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या तो आकडा लाखात होऊ शकतो. यामुळं आता सरकारवर दडपण आणलं नाही तर प्रश्न सुटणार नाही. पुढील महिन्याभरात सरकारनं कर्जमाफी केली नाही तर नाशिकचा हा मोर्चाही फक्त सुरुवात आहे. यापेक्षाही मोठं आंदोलन ठिकठिकाणी करू अशा इशारा शरद पवार यांनी सरकारला दिला.

देवाभाऊ तुम्ही सगळ्या महाराष्ट्रात तुमचे फोटो लावलेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे आशीर्वाद घेता हे तुम्ही यातून दाखवलं. महाराज असताना ज्यावेळी राज्यात दुष्काळ पडला तेव्हा त्यांनी नांगराची फाळ बसवण्यासाठी सोनं देत बळीराजाला मदत केली होती. हा बळीराजा उपाशी राहिला तर देश उद्ध्वस्त होईल असं महाराजांनी म्हटलं होतं. हाच आदर्श देवाभाऊ तुम्ही घ्याल अशी आम्ही आशा करतो. देवाभाऊ हिंदुस्थानच्या आजूबाजूला बघा काय घडतंय. नेपाळमध्ये आठ दिवसात काय घडलं. राज्यकर्ते गेले आणि एक भगिनीच्या हातात राज्य आलं. असं म्हणत शरद पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना इशारा दिला.

**शेतकरी रस्त्यावर उतरला आहे**

या मोर्चाचा उद्देश शेतकरी आणि कष्टकऱ्याला न्याय देण्याचा आहे. शेतकऱ्यांच्या अनेक मागण्या प्रलंबित आहेत. प्रभू श्रीरामाचं नाव घेऊन भाजपा सत्तेत आली आहे आणि प्रभू रामानं सांगितलं आहे की, वचन दिलं ते पूर्ण करायचं असतं. पण या सरकारनं निवडणूक काळात जी वचनं दिली होती, ज्यात शेतकऱ्यांची कर्जमाफी, लाडक्या बहिणीला २१०० रुपये, भावांतर योजना या सगळ्या गोष्टी पूर्ण करण्यात सरकार अपयशी ठरलं आहे. आज आमचा शेतकरी अडचणीत सापडला आहे. त्यामुळं शेतकरी आता स्वतः रस्त्यावर उतरला आहे. शरद पवार हे या मोर्चाचे प्रतिनिधित्व करत आहेत, असं आमदार रोहित पवार यांनी सांगितलं.

**कापूस शेतकरी अडचणीत येणार**

शेतकरी अडचणीत सापडला आहे. सरकारनं निवडून येण्याआधी सातबारा कोरा करू असं म्हटलं होतं. मात्र, तसं झालं नाही. शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळत नाही. त्यामुळं शेतकरी अडचणीत सापडून आत्महत्या करत आहे. सुरूवातीला कापूस आयात करण्यासाठी १२ टक्के कर लावला जातो तो आता रद्द करण्यात आला. त्यामुळं विदेशातून मोठ्या प्रमाणात कापूस भारतात येईल. येथील शेतकऱ्यांच्या कापसाला भाव मिळणार नाही. त्यामुळं अधिक अडचणी निर्माण होतील, असं माजी मंत्री अनिल देशमुख यांनी सांगितलं.

# एसटी प्रवर्गातून आरक्षण मागणी लाखोंच्या संख्येने जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला बंजारा जनसागर

बीड । प्रतिनिधी

बंजारा समाज हक्काचा वाटा मागतोय, आम्ही भिक मागत नाहीत, आम्ही कोणाच्या ताटातलं मागत नाहीत किंवा कोणाचे खरकटे सुध्दा मागत नाहीत. कारण बंजारा समाज हा स्वाभिमानी समाज आहे. बंजारा समाज एवढा लाचार सुध्दा नाही की कोणाचं खरकटं मागेल अशा शब्दात भावना व्यक्त करत बंजारा समाजाला एसटीचे आरक्षण लागू करा, १७ सप्टेंबर पुर्वी एसटी आरक्षणाची घोषणा करा अन्यथा मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन काळा दिन म्हणून साजरा केला जाईल असा इशारा बंजारा समाज बांधवांनी आजच्या विराट मोर्चातून राज्य सरकारला दिला आहे.



बीडमध्ये सकल बंजारा समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर एसटी आरक्षणाच्या मागणीसाठी सोमवारी दुपारी एक नंतर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून सुरू झालेला मोर्चा माळीवेस, सुभाष रोड, आण्णाभाऊ साठे चौक, बसस्टँड समोरून छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. या मोर्चामध्ये बंजारा समाज पारंपारिक वेषभुशेत सहभागी झाला होता. एकच मिशन एसटी आरक्षण अशा घोषणांचे फलक हाती घेतलेल्या समाज बांधवांनी एसटी आरक्षणाची आग्रही मागणी सरकार आणि प्रशासनासमोर मांडली. या मोर्चाला जिल्हाभरातून बंजारा समाज बांधव प्रचंड मोठ्या संख्येने सहभागी झाला होता. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बंजारा समाजातील युवतींनी मोर्चाला संबोधित केले. यावेळी मोर्चात बंजारा समाजाचे धर्मगुरू बापूसिंग महाराज, आ.धनंजय मुंडे, आ. विजयसिंह पंडित, आ.संदीप क्षीरसागर, मराठा समन्वयक, गंगाधर काळकुटे, योगश क्षीरसागर यांच्यासह समाज बांधव लाखोंच्या संख्येने सहभागी झाला होता.

## रस्त्यावरची अन कायदेशीर लढाईत मी सोबत-आ.धनंजय मुंडे

अनेक वर्षापासूनच्या असलेल्या मागणीला वाचा फुटली आहे. तर राज्यात असलेल्या बंजारा बांधवांना एसी आणि एसटीचा आरक्षण मग आमच्या महाराष्ट्रातीलच बंजारा बांधवांनी काय पाप केले. सरकारने एका समाजाला हैदराबाद गॅझेट लागू केले तोच गॅझेट बंजारा समाजाला लागू करून एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्यात यावे. माझे नशीब नेहमीच बलत तर आहे मी आज सरकारच्या मंत्रीपदावर नाही म्हणून मला समाजाच्या न्याय मागणीला रस्त्यावरची लढाई लढताना येता आले. समाजाच्या रस्त्यावरच्या आणि कायदेशीर लढाईत मी सोबत राहणार असून सरकारला आरक्षण देण्यासाठी मागणी करणार असे मत आ. धनंजय मुंडे यांनी व्यक्त केले.

## मुक्तीसंग्राम दिन काळा दिन साजरा करणार

लाखोंच्या संख्येने दाखल झालेले बंजारा बांधव आपल्या न्याय हक्काची मागणी करत आहे. इंग्रज सरकारांपासून ते निजाम सरकारांपर्यंत सर्वांनीच बंजारा समाजाला आदिवासी म्हणून नोंदी केलेले आहेत. इतर सर्व राज्यात बंजारा समाजाला एसी आणि एसटी मध्ये आरक्षण आहे मग महाराष्ट्रातच व्हीजेएनटी आणले कुठून? असा सवाल उपस्थित करत मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या पहिले आरक्षण बाबत हालचाली न केल्यास मराठवाडा मुक्ती संग्राम दिन काळा दिन म्हणून महाराष्ट्रातील बंजारा समाज साजरा करणार असे मोर्चाला संबोधित करणाऱ्या मुलींनी व्यक्त केली.

जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा धडकल्यानंतर मोर्चा ठिकाणी प्रशासनाने येऊन निवेदन स्वीकारावे अशी मागणी करण्यात आली होती. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी मोर्चा ठिकाणी येत मुलींच्या हस्ते निवेदन स्वीकारावे.

## पारंपरिक वेशभूषेतील महिलांनी वेधले लक्ष

हैदराबाद गॅझेटनुसार बंजारा समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्यात यावा या मागणीसाठी सोमवारी भव्य दिव्य मोर्चा काढण्यात आला. या मोर्चामध्ये जिल्ह्यातून दाखल झालेल्या महिला भगिनींना पारंपरिक वेशभूषेत येत आपली मागणीची घोषणा देतांना शहरातील नागरिकांचे लक्ष वेधून घेतले होते.

## एकीचे न नेकीचे दर्शन

जिल्ह्यातून दाखल झालेल्या बंजारा समाज बांधवांकडून मोर्चा सुरू झाल्यापासून ते समारोप होऊ पर्यंत एकजुट दाखवत शिस्तीत आणि शांतता प्रिय मोर्चा पार पडला. त्यानंतर पोलीस प्रशासनाला सहकार्य करत समारोप करण्यात आला.

## यांनी दिला मोर्चात जाहीर पाठींबा

मराठा योद्धा मनोज जरांगे यांच्या सूचनेवरून मराठा कृती समितीचा जाहिर पाठींबा, धनगर महासंघ, वंजारी महासंघ, आ.धनंजय मुंडे, आ. विजयसिंह पंडित, आ. संदीप क्षीरसागर यांनी मोर्चात सहभागी होत जाहिरात पाठिंब्याचे पत्र दिले.

## धर्मगुरू बाबूसिंग महाराज मोर्चा रॅलीत सहभागी

बंजारा समाजाची कशी समजल्या जाणाऱ्या पोहरादेवी देवी येथील महंत बाबूसिंग महाराज बीड येथील एसटी आरक्षण मोर्चा रॅलीत सहभागी झाले होते.

## भविष्याच्या लढाईसाठी चिमुकल्याच्या हाती फलक

जिल्ह्यातील तांड्यांमधून सर्वच समाजबांधव आरक्षण मागणीसाठी रस्त्यावर उतरले होता. यावेळी अनेक माताभगिनीसोबत लहान लेकर मोर्चात सहभागी झाले होते. यावेळी अनेक लेकरांचकडून स्वतःच्या भविष्यासाठी सुरू असलेल्या लढाई घोषणेचे फलक घेऊन मोर्चात सहभागी झाल्याचे दिसले.


# शासनाने अतिवृष्टी पावसाने झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून सरसकट नुकसान भरपाई द्यावी-आ.संदीप क्षीरसागर

## शेतकऱ्यांना, नागरिकांना स्वतःची आणि आपल्या पशुधनाची काळजी घेण्याचे केले आवाहन

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हासह शहर आणि तालुक्यात मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने शेतकऱ्यांचे आणि ग्रामस्थांचे नुकसान झाल्याने शासनाने नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून सरसकट नुकसान भरपाई देण्याची मागणी आ. संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.

बीड शहर व तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर काल रात्रीपासून मोठ्या प्रमाणावर पाऊस झाल्यामुळे बिंदुसरा तसेच इतर छोटे-मोठे तलाव,नदी,ओढे तुडुंब भरले असून पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. काल रात्री झालेल्या पावसाने पीक, पशुहानी, शेतकरी बांधव व ग्रामस्थांचे मोठे नुकसान झाले आहे. या सर्व नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून सरसकट नुकसान भरपाई देण्याची मागणी राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री मा.ना.अजित दादा पवार तसेच




बीडच्या जिल्हाधिकारी यांना बीड विधानसभेचे आ.संदीप क्षीरसागर यांनी पत्र देऊन केली आहे.

बीड विधानसभा क्षेत्रातील बीड व शिरूर (का) तालुक्यातील सर्वच महसूल मंडळामध्ये दि.२८ ऑगस्ट २०२५ दरम्यान झालेल्या आणि १३ सप्टेंबर २०२५ पासून ते आजपर्यंत सुरू असलेल्या अतिवृष्टीच्या पावसाने क्षेत्रातील उभा असलेला सोयाबीन, कापूस, बाजरी आदी पिकांचे तथा फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तसेच शेतकरी बांधवांच्या पाळीव पशुधनाचे देखील नुकसान झाले आहे. यासह शहरी व ग्रामीण भागात देखील पावसामुळे मोठी पडझड झाली आहे. आजपर्यंत सुरू असलेल्या अतिवृष्टीच्या पावसाने विद्युत पोल, तारा व रोहित्र नुकसान झाल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे शासनाच्या वतीने झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकरी बांधवांना व ग्रामस्थांना सरसकट नुकसान भरपाई देण्याची मागणी बीड विधानसभेचे आ.संदीप

पान दोन वर

# लिंबागणेश ते बोरखेड मार्गावरील रस्ता खचल्याने वाहतूक ठप्प; ग्रामस्थांची तातडीच्या दुरुस्तीची मागणी





लिंबागणेश । प्रतिनिधी

रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे लिंबागणेश-बोरखेड रस्ता खचला असून परिसरातील गावांतील व वस्तीवरील नागरिकांची दळणवळणाची मोठी अडचण झाली आहे. या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी सरपंच बालासाहेब जाधव, सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, बाळासाहेब मुळे, सुरेश निर्मळ, संजय घोलप, विजय वाणी, तुकाराम गायकवाड आदी ग्रामस्थांनी केली आहे.

तलाठी गणपत पोतदार आणि ग्रामविकास अधिकारी श्रीराम वीर यांनी पान दोन वर

# मुसळधार पावसाचा तडाखा, पुल, रस्ते वाहून गेले, जनजीवन विस्कळीत

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे तालुक्यातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. मुसळधार पावसाचा तडाखा इतका जबरदस्त आहे की, अनेक ठिकाणी रस्ते वाहून गेले असून काही गावांचा संपर्क तुटला आहे.ग्रामीण भागातील ग्रामस्थांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

राक्षसवाडी व केकाणवाडी परिसरातील पाझर तलाव पावसाच्या पाण्याने फुगून फुटल्याने हजारो हेक्टर शेती पाण्याखाली गेली आहे.सोयाबीन, कापूस, मका यांसह खरीप हंगामातील विविध पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून



शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढावले आहे. प्राथमिक अंदाजानुसार लाखों रुपयांचे नुकसान झाले असल्याचे

पान दोन वर

# अतिवृष्टीमुळे नागरिक अडचणीत; माजी आ.भिमराव धोंडे यांनी पूरग्रस्त भागांना तातडीने दिल्या भेटी

आष्टी । प्रतिनिधी

गेल्या २४ तासांपासून झालेल्या सततच्या अतिवृष्टीमुळे आष्टी, पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यातील अनेक भागात पाण्याचा मोठा प्रकोप झाला आहे. ढगफुटीच्या स्वरूपात झालेल्या पावसामुळे नाले-ओढ्यांना पूर आला असून अनेक ठिकाणी नागरिक अडकून पडले आहेत. या परिस्थितीची दखल घेत माजी आ. भिमराव धोंडे यांनी आष्टी तालुक्यातील पूरग्रस्त भागांना भेट देऊन पाहणी केली. त्यांनी प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घेत नागरिकांशी संवाद साधला व त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.





यावेळी मा.आ. धोंडे यांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, उपविभागीय अधिकारी (एस.डी.एम.) श्रीमती वसीमा शेख व तहसीलदार श्रीमती वैशाली पाटील यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधत तातडीने मदतकार्य सुरू करण्याच्या सूचना दिल्या. नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देऊन आवश्यक ती सर्व उपाययोजना त्वरित राबवाव्यात, अशा स्पष्ट सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या.

नागरिकांच्या सुरक्षेसाठी प्रशासन पूर्णपणे सज्ज असून मदतकार्याला वेग देण्यात येत आहे. नागरिकांनी घाबरून न जाता प्रशासनाशी सहकार्य करावे, असे आवाहन मा.आ.भिमराव धोंडे यांनी केले.

# आष्टी-पाटोदा-शिरूर अतिवृष्टी : जनजीवन विस्कळीत; शासनाने तात्काळ पंचनामे करा-राहुल जाधव

पाटोदा । प्रतिनिधी

आष्टी-पाटोदा-शिरुर तालुक्यात गेल्या तीन दिवसांपासून मुसळधार पावसाने हाहाकार माजवला आहे. या तीनही तालुक्यातील अनेक भाग पाण्याखाली गेला असून नद्या-नाले तुडुंब भरून वाहत आहेत. सततच्या पावसामुळे शेतीपिकांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांचे पिके पाण्याखाली असल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक संकट कोसळले आहे. गावांमधील रस्ते, ओढे व पुलांवर पाणी आल्याने मोठमोठे खड्डे पडल्याने



वाहतूक ठप्प झाली आहे. काही ठिकाणी घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांचे संसार उपयोगी साहित्य देखील वाहुन गेले आहे.प्रशासनाने तात्काळ शेतकऱ्याच्या शेतात जाऊन पंचनामे करावे व तत्काळ शेतकऱ्याला मदत करावी. सततच्या पावसामुळे लोकांच्या घरे पडले आहेत त्यांचेही पंचनामे करून तात्काळ मदत करावी. अशी मागणी राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष राहुल शाहुराव जाधव यांनी तहसीलदार, उपविभागीय अधिकारी यांना प्रसिद्धी पत्रकाद्वारे मागणी केली आहे.

# मराठा समाजाबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य: लक्ष्मण हाके, नवनाथ वाघमारे यांच्याविरुद्ध परळीत गुन्हा

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

मराठा समाजाबद्दल जाती आधारित वक्तव्यामुळे आमचा अपमान व मानहानी झाली असुन याबाबत गुन्हा दाखल करावा, अशी मागणी सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आली होती. या अनुषंगाने परळी पोलीस ठाण्यात लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे या दोघांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिस सूत्रांकडून प्राप्त अधिक माहितीनुसार परळीतील मराठा समाज बांधवांनी पोलीस स्टेशनला एका निवेदनाद्वारे लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल

पान दोन वर

# बीड जिल्ह्यातील सर्व शाळांना आज सुट्टी

## अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांकडून आदेश!

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यात गेल्या दोन दिवसापासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे बहुतांश तालुक्यात अतिवृष्टीची नोंद झाली आहे अनेक नद्या नाल्यांना महापूर आल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे त्यामुळे हवामान विभागाच्या अंदाजानुसार पावसाचा जोर कायम राहणार असल्याने बीड जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्ह्यातील सर्व खाजगी आणि सरकारी शाळा अंगणवाडी आश्रम शाळा महाविद्यालय यांना मंगळवारी सुट्टी जाहीर करण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉनसन यांनी म्हटले आहे.

बीड जिल्ह्यासह मराठवाड्यात गेल्या दोन-तीन दिवसापासून मोठ्या प्रमाणात मुसळधार पाऊस कोसळत आहेत जिल्ह्यातील १६ मध्यम आणि १२६ लघु प्रकल्प वसंतून वाहत असल्यामुळे शिरूर पाटोदा आष्टी बीड वडवणी गेवराई अंबाजोगाई परळी या तालुक्यातील अनेक गावांचा संपर्क तुटला आहे.

गोदावरी नदीपात्रामध्ये एक लाख दिवसात पेक्षा अधिकच पाणी विसर्ग करण्यात येत आहे तसेच

पान दोन वर

हे पत्रक, मुद्रक व प्रकाशक विलास दिगंबरराव डोळसे यांनी विश्वकर्मा ऑफसेट प्रिंटर्स, पाटोदा (४१४२०४) जि.बीड येथे छापून सायं. दै. पाटोदा संचार कार्यालय, बसस्टॅण्डसमोर पाटोदा जि. बीड येथे प्रसिध्द केले. (संपादक- विलास डोळसे) मोबा.९४२३४७१८३३ (बीड न्याय कक्षेत)

"Printed by Vilas Digambarrao Dolse, Published byVilas Digambarrao Dolse, on behalf of Vilas Digambarrao Dolse, and Printed at Vishwakarma Offset Printers, Patoda (414204), Dist. Beed. and published from Eveing Daily Patoda Sanchar in front of Bus Stand, Patoda Dist. Beed Editor Vilas Dolse,(Beed Justice)

# संचार

## जाहिर प्रगटन, कोर्टाची जाहिर नोटीस, जन्म-मृत्युची नोंद, निविदा सुचना, ई टेंडर, नावात बदल, वाढदिवस शुभेच्छा जाहिरात तसेच इतर जाहिराती व बातम्या प्रसिध्दीसाठी संपर्क करा

**९४२३४७१८३३**

**७०२०६४२६९३**




**दै. संचार च्या अंकाची पीडीएफ आपल्या मोबाईलवर मिळविण्यासाठी ९४२३४७१८३३ या मोबाईल नंबरवर मेसेज करा किंवा क्यूआर कोड स्कॅन करा**